# बालस्वातंत्र्य दिन

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने ३१ ऑगस्ट हा दिवस 'बालस्वातंत्र्य दिन' म्हणून साजरा करायचे ठरविले आहे. हा कार्यक्रम केवळ 'परिषदे'चा कार्यक्रम न राहता, तो संपूर्ण समाजाचा कार्यक्रम ठरावा, त्यायोगे बालकांच्या शिक्षणाच्या, पोषणाच्या नि वर्धनाच्या दृष्टीने, समाजात जाणीव जागृती व्हावी हा, अशात-हेने बालस्वातंत्र्य दिन साजरा करण्यामागचा प्रधान हेतू आहे.

बालस्वातंत्र्याची संकल्पना आणि तिच्या प्रस्थापनेची गरज दोन दृष्टिकोणांतून समजावून घेता येईल. एक आहे नकारार्थी बाजू, जी बालकांबाबत काय होऊ नये याची जाणीव देईल ; तर दुसरी म्हणजे होकारार्थी दृष्टिकोणांतून बालकांविषयी विचार करताना, बालकांची वकिली करताना, जे काही घडू नये म्हणून सांगितले जाईल, त्याची कारणमिमांसाच होकारार्थी दृष्टिकोण आपल्यापुढे आणणार आहे. थोडक्यात असे की, बालकांचा ‘बालक' म्हणून विचार करताना, बालकाचा 'विकासक अंगा' ने विचार करताना, बालकाच्या आजच्या परिस्थितीकडे दृष्टिक्षेप टाकणे अनिवार्य आहे; आणि मग बालकाबाबत, त्याच्या कुटुंबात, शाळेत, समाजात, सगळीकडेच जेजे अन्या यकारक असेल, जे जे अनितीकारक असेल, जे जे बालकाच्या बाल्यावस्थेत नि त्याच्या जगण्याच्या स्वयभू प्रेरणेस मारक ठरणारे असेल, त्याला विरोध करण्यासाठी कृतीशील होणे आवश्यक आहे. 'बालस्वातंत्र्य दिन' साजरा करण्याचे प्रतिकात्मक पाऊल हे, या कृतीशीलतेचे पहिले पाऊल आहे, असे मानता येईल.

बालकाच्या स्वातंत्र्याचा विचार अनेक शिक्षणतज्ज्ञांनी मांडलेला आहे, रूसोने बालकाच्या विकासासाठी, त्याला कुठल्याही सामाजिक बंधनांच्या बाहेर ठेवूनच आणि निसर्गाच्या सान्निध्यातच शिक्षणाची संधी दिली पाहिजे असा विचार मांडला, डुईसारख्यांनी, सामाजिक संकेतांच्या चौकटीतच बालकाच्या स्वातंत्र्याचा विस्तार करण्याचा विचार मांडला. या दोन टोकांच्या मतांमध्ये सुद्धा साम्य आहे. ते मात्र बालकाच्या स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान देण्याचा सर्वच प्रयोगशील शिक्षणतज्ज्ञांनी तसे ते दिले आहे, याचे कारण असे की, पठडीबद्ध, वर्गबद्ध, शिक्षणकेंद्री अशा परंपरागत शिक्षणाचे दोष त्यांना प्रकर्षाने जाणवत आहेत. सर्वच बालस्वातंत्र्यवादी शिक्षणतज्ज्ञांनी तसे मत दिले आहे. याचे कारण असे की, पठडीबद्ध, वर्गबद्ध, शिक्षककेंद्री अशा परंपरागत शिक्षणाचे दोष त्यांना प्रकर्षाने जाणवले आहेत. सर्वच बालस्वातंत्र्यवादी शिक्षणतज्ज्ञांनी आणखी एक गोष्ट ठामपणे मांडली आहे. ती म्हणजे, बालवय हा मनुष्याचा आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा काळ असतो. माणसाच्या विकासाचा तो उच्चतम काळ असतो, आणि या काळात बालक अंतर्गत उर्मीतून आपल्या विकासाची पाऊलवाट चालत असतो, आणि ही उर्मी टिकवूनच त्याला शिक्षणाच्या

पायवाटेवर आणायचे असते. साहजिकच बालकाच् या दृष्टिने योग्य शिक्षण कोणते असावे व ते कसे दिले जावे. हे प्रौढांनी ठरविणे ही अनेक स्वातंत्र्यबाबी शिक्षण तज्ज्ञांना विसंगत बाब वाटते. फ्रोबेल काय किंवा माँटेसोरी काय, दोघांनीही असे दाखवून दिले की, बालकाच्या अंतर्गत प्रेरणाच मुलाला स्वयंशिक्षणसाठी कार्यरत करीत असतात आणि म्हणूनच आपल्यासाठी योग्य शिक्षण कोणते हे ही बालक स्वतःच ठरवीत असते. अलीकडच्या काळातील शैक्षणिक मानसशास्त्रज्ञ पियाजे याने या त्यांच्या मतास दुजोरा दिला आहे, आणि गेल्या दशकातील मेंदूविषयक संशोधनाने तर या विचारावर शिक्कामोर्तब केले आहे. थोडक्यात असे की, बालकाच्या बाबतीत प्रौढांचा अपेक्षापेक्षा बालकाच्या नैसर्गिक गरजाच त्याच्यासाठी कशात-हेचे शिक्षण असावे ते सांगत असतात. या गरजा ओळखायला शिकणे हे एक प्राथमिक स्वरूपाचे काम, अल्पवयातील बालकाच्या नजिकच्या प्रौढांनी, म्हणजे त्याच्या पालकांनी आणि ब लशाळेतील शिक्षकांनी करायचे असते.

सहा – सात वर्षापर्यंत बालकाच्या सर्वच कृती स्वयंप्रेरणेने भारलेल्या असतात. अशावेळी, त्याच्या विविध संदर्भातील वागणूकीचे अवलोकन करूनच बालकाच्या गरजा ओळखणे किंवा बालक समजावून घेणे शक्य असते, अशी एक दिशा माँटेसोरीबाईं नी सांगून ठेवली आहे. त्यामुळेच 'बालकाचे अवलोकन' ही बालकशिक्षणातील एक महत्त्वाची गोष्ट मानली जाते. बालशाळेत शिक्षिका म्हणून काम करणायाला यासाठीच बालमानसशास्त्राचा अभ्यास अनिवार्य मानला आहे. हे जे बालअवलोकनाचे काम, जाणीवपूर्वक शिक्षिकेने शाळेत करायचे असते. तेच घरी पालकांनी करायचे असते. अर्थातच यावरून एक गोष्ट स्पष्ट होईल की, बालकाच्या नैसर्गिक, स्वप्रेरणेने वागण्याचे अवलोकन करून बालक समजावून घ्यायचे असेल तर त्याला मुक्त वातावरणात राखूनच करणे शक्य आहे. यालाच, 'बालकाचे मुक्तपणे वागण्याचे स्वातंत्र्य' असे म्हणता येईल. बालकाच्या स्वतंत्र्याचा हा मूलभूत अर्थ आहे. दुसरे असे की, या वयातील बालकाचा होणारा भावनिक, बौद्धिक, शारीरिक आणि सामाजिक विकास हा, बालक व त्याच्या आजूबाजूचे वातावरण यांच्या परस्पर संबंधातून होत असतो. आपली कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये यांच्या सहाय्याने; लहान मूल, आजूबाजूच्या वातावरणातील असंख्य गोष्टींचे, त्याच्या परीने अर्थ समजावून घेत असते. हे एकीकडे घडत असताना दुसरीकडे त्याच्या मेंदूतील जन्मापूर्वी अपुरी राहिलेली, पेशींच्या परस्परबांधणीची पक्की प्रक्रियाही घडून येत असते. बालकाच्या सर्वांगीण विकासाची ही एक आवश्यक अशी अट असते. या कालात, बालकावर कुठल्याही त-हेचे, म्हणजे भावनिक वा बौद्धिक दडपण आणले तर या नैसर्गिक प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होऊन, त्या बालकाचे कायमचे नुकसान होण्याची शक्यता असते. यासाठीच बालक, आपल्याकडे, 'विकासक स्वातंत्र्या'ची मागणी करीत असते. हे वय हे बालकाच्या मुक्त हालचालींचे, मुक्तपणे खेळण्या - बागडण्याचे, मुक्त विचारांचे नि मुक्त कल्पनाशक्तीचे असते. अशावेळी त्याच्यावर कृत्रिमरित्या, तथाकथित, औपचारिक अभ्यासाचे, लिहिण्या - वाचण्याचे, बेगडी शिस्तीचे आणि प्रौढांच्या वागण्याच्या संकेतांचे ओझे लादले तर त्याच्या स्वयंप्रेरणेने

होणाऱ्या स्वयंविकासाची वाटच अडविली जाते. आणि मग याचेही गंभीर परिणाम वाढत्या वयात, बालकाला भोगावे लागतात.

बालकाला बालशाळेत स्वातंत्र्याचे वातावरण लाभले पाहिजे. याची पूर्ण जाण शिक्षकांना आणि संस्थाचालकांना असली पाहिजे. पालकांनीही मुलांना शाळेत घालताना या अंगाने शाळा तपासून पाहिली पाहिजे. शाळेचा भर कुठल्याही प्रकारच्या पुस्तकी अभ्यासावर नाही ना, याची कसून चौकशी केली पाहिजे. वेळप्रसंगी शाळांवर सांघिक दबाव आणून, बालकांच्या स्वातंत्र्यासाठी, त्यांना बदलायला भाग पाड ले पाहिजे. याचबरोबर अर्थातच, आपले घरही, बालकही एक स्वतंत्र व्यक्ती आहे असे मानून, त्याच्या स्वतंत्रतेच्या गरजांच्या पूर्तीसाठी सदैव सज्ज ठेवले पाहिजे.

घरातील बालस्वातंत्र्याचा अर्थ आहे, घरात मनमोकळेपणा मुक्त वातावरण असणे, बालकाच्या भावनांची कदर करणारे अ णि बालकाला सदैव सुरक्षित वाटेल असे वातावरण असणे. बालकाच्या शिक्षणाची केवळ सुरूवातच घरात होते असे नाही तर, लहान वयातले बहुतेक सारे शिक्षण घरातच होत असते. मूल शाळेत जायला लागले की, त्याच्या घरच्या शिक्षणाला शाळेतील शिक्षणाची जोड मिळते इतकेच. स्वतःची भाषा मूल घरातच शिकत असते. पहिले - वहिले सामाजिक संबंधही घरातच जुळत असतात. वागणूकीचे नीती - नियम, बालक, घरातूनच आत्मसात करत असते. व्यक्तिगत नि सामाजिक मूल्यांचे शिक्षणही बालकाला, घरातील प्रौढांच्या आचार व विचारांतून प्राप्त होत असते.

अशाप्रकारचे विविध प्रकारचे शिक्षण बाल क आपणहून, आपल्या घरातच मिळवत असेल तर ते विनासायास म्हणजे सहजपणे मिळण्यासाठी मुलाला घरात दबावाचे नव्हे तर मुक्ततेचे वातावरण मिळावे लागेल. घरातील व्यक्ती – व्यक्तींमध्ये तणावाचे, अशांततेचे वातावरण असेल तर त्याचेच एक दडपण बालकाच्या मनावर राहते नि मग त्याची कुचंबणाच होते. याउलट घरात परस्परांमध्ये सहकाराचे नि प्रसन्नतेचे वातावरण असेल तर बालकाची प्रगती वेगाने होते. यासाठी पालकांची भूमिका जबाबदारीची आणि बालकाला गरजांनुसार सहाय्य करण्याची असावी लागेल. घरातील सहकाराचे वातावरण हे बालस्वातंत्र्याचेच आणखी एक नाव आहे. त्याच्या मूल हे मूल आहे, ते म्हणजे प्रौढमाणसाची लहानशी प्रतिकृती नाही, याचे भान ज्या समाजात असते, तो समाज बालस्वातंत्र्याधिष्ठित समाज आहे, असे आपल्याला म्हणता येईल. अशा समाजनिर्मितीच्या दिशेने आपल्याला जायचे आहे. बालस्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण स्वतःलाच ह भान देऊया. बालकाच्या बाबतीत एक समंजस प्रौढ म्हणून आपली भूमिका निभावू या. बालकांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आपणच आपल्या पारंपारिक विचारांच्या गुलामीतून मुक्त होऊया. यातच बालकाचे स्वातंत्र्य दडले आहे.

❖